- प्रेसनोट –

# पुणे शहर पोलीस आयोजित 'मिशन परवाज' उपक्रमाचा शुभारंभ.

दिनांक २३/१२/२०१७ रोजी मा. रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे शुभहस्ते सावीत्रीबाई फुले सभागृह, गंजपेठ, पुणे या ठिकाणी 'मिशन परवाज' उपक्रमाचा उदघाटन समारंभ संपन्न झाला.

'मिशन परवाज' हा उप्रक्रम पुणे शहर पोलीस आयुक्तालयात मा. रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनानुसार सुरु करण्यात आलेला आहे. या उपक्रमा अंतर्गत पुणे शहरातील तरुण मुस्लीम युवक-युवतींना पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण, एम.पी.एस.सी, यु.पी.एस.सी परिक्षा तसेच आय.टी.आय व इतर विविध कोर्स याबाबत विविध क्षेत्रातील तज्ञांमार्फत मोफत मार्गदर्शन करुन नोकरी मिळवण्याकरीता मदत करण्यात येत आहे. 'मिशन परवाज' या उपक्रमाची खडक पोलीस ठाणे येथुन सुरुवात करताना प्रथम ०३ कॅम्प, मुस्लीम वस्तीमध्ये घेऊन इच्छुक ३७७ मुस्लीम युवक-युवतींचे फॉर्म भरुन घेऊन माहीती संकलित करण्यात आली आहे.

मिशन परवाज अंतर्गत ज्या युवक-युवतींना आयटी.आय. प्रशिक्षण घ्यावयाचे आहे (उदा. वेल्डर, फिटर, मोटर मॅकेनिक, ए.सी. मॅकेनिक, टेलिंरग इ.) त्या कोर्सेससाठी सिग्मा स्किल एक्सलंन्स सेंटर, चिंचवड, पुणे हे, पुणे पोलीसांच्या विनंतीवरुन मोफत प्रशिक्षण देणार आहेत. कोर्स पुर्ण झालेल्या मुला-मुलींना जॉब मिळणेसाठी देखील मार्गदर्शन व मदत करणार आहेत. पोलीस भरती होणे करीता श्री. सचिन ढवळे यांचे सचिन करियर अॅकेडमी येथे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. व एस.आर.पी.एफ. ग्रुप क्रमांक २ पुणे या ग्राऊंडवर मोफत शारीरीक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच पोलीस भरतीचे लेखी परिक्षेसाठी तज्ञांकडुन मार्गदर्शन मिळणेकरीता टिम परवाज कडुन व्यवस्था करण्यात आलेली आहे.

"मिशन परवाज" हा उपक्रम राबविणेकरीता **१)** मा. प्राध्यापक डॉ. गुलाब पठाण (एच. ओ. डी. सोशालॉजी पुना कॉलेज) **२)** मा. प्राध्यापक डॉ. विशाल जाधव (एच. ओ. डी. सोशालॉजी टिळक आयुवेदिक कॉलेज) **३)** मा. श्री. रियाज पिरजादे, (सिम्बायसेस) **४)** मा. श्री. शफी शेख, (संचालक - सिग्मा स्किल एक्सलंन्स सेंटर, चिंचवड, पुणे) **५)** मा. श्री. शफी पठाण, (टेक्निकल लिड, आय.बी.एम कंपनी) या पाच जणांची टीम कार्यरत आहे.

मिशन परवाज उद्घाटन सोहळयाची प्रस्तावना मा. डॉ.बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, पुणे यांनी केली तसेच उपस्थित युवक-युवतींना मा. रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त पुणे शहर, मा. रविंद्र कदम, पोलीस सह-आयुक्त, पुणे शहर, मा. रविंद्र सेनगांवकर, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर व मुस्लीम समाजाचे वतीने मौलाना श्री. कारी इद्रीस व मौलाना शबीउल हसन काझमी यांनी मार्गदर्शन केले. तसेच पुणे पोलीसांचे वतीने मिशन परवाज टिममधील ५ सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

मिशन परवाज सोहळयाचे अध्यक्षीय भाषणामध्ये मा. रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे् शहर यांनी युवक-युवतींना मार्गदर्शन करून, 'मिशन परवाज या उपक्रमा अंतर्गत आतापर्यंत ०९ युवकांना रोजगार मिळाला आहे. मिशन परवाज उपक्रम खडक पोलीस ठाणे येथून सुरू झाला आहे. यापुढे ही पुणे पोलीस आयुक्तालयातील मुस्लीमबहुल वस्ती असलेल्या १५ पोलीस स्टेशनच्या हद्दीत मिशन परवाज या उपक्रमा अंतर्गत जास्तीत जास्त मुस्लीम युवक-युवतींना रोजगार मिळवुन देणार आहोत' असे सांगितले.

उद्घाटन सोहळयास मार्गदर्शन करण्यासाठी मा. रविंद्र कदम, पोलीस सह-आयुक्त, पुणे शहर, मा. रविंद्र सेनगांवकर, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा. प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे शहर, मा. संजय बावीस्कर, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे, मा.डॉ. बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ पुणे शहर, मा. प्रविण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ पुणे, मा. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, बाजीराव मोहिते, शहर विभाग पुणे व इतर पोलीस अधिकारी उपस्थित होते. तसेच मुस्लीम समाजाचे विविध क्षेत्रातील मान्यवर, नगरसेवक,पत्रकार तसेच नोकरीकरीता इच्छुक असलेले मुस्लीम युवक-युवती व त्यांचे पालक मोठया संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

खडक पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राजेन्द्र मोकाशी व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या विशेष परिश्रमाने मिशन परवाज या उपक्रमाचे पहिले सत्र व उद्घाटन सोहळा संपन्न झाला.